Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

बंजारा समाज सुधारक महानायक वसंतरावजी नाईक

निसर्ग निरंजन आडे
फूलसिंग नाईक कला वाणिज्य विज्ञान महाविघ्यालय, पुसद
ता.पुसद जि.यवतमाळ

प्रास्तविक :-

वसंतरावजी नाईक यांची खरी ओळख ही महाराष्ट्राच्या हरित क्रांतीचे जनक अशी आहे. ग्रामीण भागातील बंजारा समाजात जन्मलेले नाईक साहेब स्वकर्तुत्वाने राजकारण व समाजकारण यात तळपू लागले. बुध्दीमता, संघटन कौशल्य, दुरदुष्टी, अखंड परिश्रम, सर्वसामान्य, उपेक्षित व शेतकऱ्याबद्दली कळकळ हे त्यांचे गुण त्यांना राजकारणांच्या सर्वोच्च पदावर पोहचून सुध्दा ते मनाने शेतकरीच होते.[१] वसंतरावजी नाईकांनी आधुनिक महाराष्ट्राचे नेतृत्व केले त्याचबरोबर त्यांनी या काळात राजकारणासोबत समाजकारण पण केल्याचे दिसून येते ते आधुनिक महाराष्ट्राचे राजकीय नेते होते. तसेच त्यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणुन १९६३ ते १९७५ पर्यंत कारभार पाहिला यासोबत त्यांनी समाजकार्यात पण स्वतःला वाहुन घेतले होते त्यासाठी कारणीभुत परिस्थिती म्हणजे महाराष्ट्र हे वैशिष्टपुर्ण से राज्य आहे. या राज्याला महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहु महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या पुरोगामी विचाराचा वारसा लाभला आहे. महात्मा फुले यांच्या विचाराने आणि कार्याने प्रभावित होवून वसंतराव नाईक यांनी बहुजन समाजाच्या व शेतकऱ्यांच्या उध्दाराचे कार्य केले.[२] १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रात समाज क्रांतीच्या चळवळींना प्रारंभ झाला त्यात बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग तर्खडकर, जगन्नाथ शंकर सेठ, लोकहितवादी, महात्मा फुले या समाजसुधारकाचा प्रभाव नाईक घराण्यावरही पडला.[३] आपल्या वडीलांनी केलेले समाज कार्य बालपणापासून पाहत आलेल्या वसंतराव नाईकांना समाजसेवेचे बळ त्यांनी आपल्या वडीलापासून घेतले होते. विद्यार्जन करीत असतांना बहुजन समाजासाठी झटणारे महात्मा फुले, दलिताच्या मानवी हक्कासाठी लढणारे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा प्रभाव त्यांच्यावर पडला होता. बाबासाहेबांनी दलित समाजाच्या उध्दारासाठी केलेल्या समाज क्रांतिपासूनच वसंतराव नाईक साहेबांनी प्रेरणा घेतली होती.[४]

सामाजिक योगदान :–

१९४० साली वसंतराव नाईक एल.एल.बी. झाले व पुसद येथे त्यांनी वकिलाचा व्यवसाय प्रारंभ केला आणि त्यांच्या सामाजिक कार्यांना गती मिळाली कारण घरची परिस्थिती समृध्द असल्याने वकिलीच्या व्यवसायाला कोणत्याही स्वरुपाचे साधन न समजता समाज कार्याचे साधन मानले.[५] तसेच वसंतराव नाईक यांनी समाजसुधारणे करीता ग्रामीण भागात आरोग्य सुधारणा, दारूबंदी, अंधश्रध्दा निर्मुलन, पहेराव सुधारणा/वेशभुषा सुधारणा आणि शैक्षणिक सुधारणा या सारख्या योजना/कार्यक्रम राबवून समाज सुधारणा करून नाईक साहेबांनी महाराष्ट्र राज्याचा विकास घडवून आणला.[६]

१) दारुबंदी :–

नाईक साहेब मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांच्या सामाजिक कार्याचे क्षेत्र अधिक विस्तृत बनले. आपल्या समाजातील दारुचे व्यसन आणि त्याचा घातक परिणाम त्यांनी पाहिला होता. शिवाय या व्यसनातून त्यांना मुक्त करण्याचा प्रयत्नही त्यांनी केला होता. भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वानुसार इतर राज्यप्रमाणे महाराष्ट्र राज्यातही दारुबंदीचे कार्यक्रम अमलात आणण्यास प्रारंभ केला. महाराष्ट्रात संपुर्ण दारु बंदीचे उद्दिष्ट १९५० साली ठरविण्यात आले तरी अटोकाट प्रयत्न करुन ही दारुबंदीचे उद्दिष्ट पुर्णतः सफल होऊ शकत नाही असे निदर्शनास आले, चोरटया दारुचे नियंत्रण करणे अशक्य झाले गावठी दारु विकून जनतेचे आरोग्य बिघडू लागले गुन्हेगारीचे प्रमाण वाढले.[७] या परिस्थितीचा आढावा घेऊन नाईक साहेबांनी दारु बंदी करण्याचे वास्तववादी व क्रांतीकारक धोरण जाहिर केले यावर देशात सर्वत्र वादंग उठले.[८] प्रतिकुल टिकेचे प्रवाह वाहु लागले वसंतराव नाईकांनी मद्यपाना विषयीचे धोरण १ जानेवारी १९६४ ला जाहिर केले. चाळीस वर्षावरील परवाना धारकांनाच हा मद्य पिण्याची सुट देण्यात आली. हॉटेलमधून मद्याची खुली विक्री करण्याचा निर्णय १ डिसेंबर १९७१ पासून घेतला गेला. त्यावर एक निर्बंध ठेवला तो म्हणजे ही सौम्य मद्य २१ वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या व्यक्तीस हॉटेलात पिता येणार नाही. त्यामुळे या जमातीचा व्यवसाय बंद झाला होता.

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

त्यांना परत आपला उद्योग प्राप्त झाला. राज्यात ८ ऑगष्ट १९७२ पासुन दारुबंदी पुर्ण पणे उठविली. यामुळे सरकारचे उत्पन्न वाढले. महाराष्ट्रातील साखर कारखाण्यांना दारु काढण्याची परवानगी देण्यात आली. सरकारच्या उत्पन्नातही त्यामुळे भर पडली आणि द्राक्षापासून शेतकऱ्याचे उत्पन्न वाढले.[९] आणि आज मद्यपानाचे परिणाम आपल्या समोर आहेच ह्यांचा समाजावर व राष्ट्रावर काय परिणाम होत आहेत. यामुळे आज अनेक घरे उध्ववस्त होत आहेत वसंतराव नाईकाचे दारुबंदीचे कार्यक्रम यशस्वी झाले असते तर बऱ्याच प्रमाणात यात सुधारणा झाली असती महाराष्ट्र राज्याचा सामाजिक जडणघडणेत मदत झाली असती.

२) अंधश्रध्दा निर्मुलन :–

वसंतराव नाईक साहेबांनी ग्रामीण भागातील लोकांमधील वाईट रुढी, प्रथा, परंपरा, धार्मिक अंधश्रध्दा, दुष्ट चालीरिती, हुंडा पध्दती, नवस, विवाह पध्दतीतील मागसलेपणा, शिक्षणाबद्दल उदासिनता घालवणयाकरीता नाईक साहेबांनी बरेच प्रयत्न केले.[१०] त्यासाठी नाईक साहेबांनी खेड्यापाड्यातील बंजारा समाजाच्या तांड्यावर, वस्तीवर जावून तेथील लोकांना एकत्र बोलावून या जुनाट प्रथा परंपरा सोडण्याचा आग्रहीपणे पुरस्कार केला.[११] आणि आज बऱ्याच प्रमाणात बंजारा समाज हा अंधश्रध्देतून बाहेर पडल्याचे दिसून येते. त्याच बरोबर त्याचे रुढी परंपरामध्ये खुप मोठ्या प्रमाणात परिवर्तन झाल्याचे दिसून येते यांचे संपुर्ण योगदान नाईक साहेबांना जाते.

३) बंजारा समाजाची पहेराव सुधारणा :–

बंजारा समाजातील पुरुषाचा पहेराव म्हणजे एक जाडे धोतर, उपकरणे व पागोटे असा असतो. अंगात बहुतेक पांढरा कपडा व डोक्यावर लाल पागोटे असते. कमरेत चांदीचा करदोडा असतो. तसेच बंजारा समाजातील स्त्रीया लेंगा (फेट्या), काचोळी, ओडणी वापरत. अंगात चोळी व हातात दस्तदंती चुडे घालतात त्यामुळे त्या हिन्दू समाजातील स्त्रीपेक्षा वेगळ्या दिसतात त्याचबरोबर वरील पेहरावामुळे त्यांना अंग मेहनतीचे काम करत येत नसे म्हणुन नाईक साहेबांनी प्रारंभी आपल्या घरातील स्त्रीयांना महाराष्ट्रीयन पोषाख वापरण्यास सुरुवात केल्यानंतर बंजारा समाजातील स्त्रीयांनी देखील महाराष्ट्रीयन पहेराव वापरण्यास सुरुवात केले व त्यात नाईक साहेबांना यश मिळाले. त्यामुळे बंजारा समाजातील स्त्रीयाचे रुप संपूर्ण बदलनूच गेले.[१२] आज संपूर्ण महाराष्ट्रातील बंजारा समाज हा जास्तीत जास्त प्रमाणात महाराष्ट्रीयन पोषाख वापरत आहे. त्यांचे संपुर्ण योगदान हे नाईक साहेबाला दयावे लागते. त्यामुळे बंजारा समाज व महाराष्ट्रीयन जनतेमध्ये समानता निर्माण झाली आहे.

४) उपेक्षीत मागासवर्गीयांचे पुनर्वसन :–

स्वातंत्र्यानंतर भारताच्या राज्यघटनेत मागसवर्गीय समाजाला समान हक्क मिळावित म्हणुन तरतुद केली आहे. वर्गीकृत जाती व जमाती, शोषीत वर्ग यांचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक विकास व्हावा म्हणुन अनेक उपाय भारत सरकारने योजले आहेत. वसंतराव नाईक स्वतः मागासवर्गीय जातीतून पुढे आले. त्या समाजाच्या दुःखाची, अडी अडचणीची व त्यांच्या गरजेची त्यांना पुर्ण जाणिव होती. त्याची सुधारणा व्हावी व समाजात सन्मान मिळावा असे त्यांना वाटते होते. याच तळमळीतून वसंतराव नाईक यांनी मागासवर्गीयांना घरे बांधण्यासाठी त्यांना गृह निर्माण संस्था मार्फत सवलती दिल्या त्यासाठी जमीन सुध्दा विनामुल्य देण्याची व्यवस्था केली. भारतीय समाज शेती जास्त प्रमाणात करतो म्हणुन समाजातील भुमीहिनांना शेतजमीन उपलब्ध करुन दिली. त्याची आर्थीक स्थिती सुधारावी आणि शेतीतील उत्पन्न वाढावे म्हणुन शेतीची सुधारलेली अवजारे, यंत्रसामुग्री घेण्यासाठी बिनव्याजी कर्ज देण्याची व्यवस्था केली. लहान–लहान उद्योगधंद्यासाठी सवलती उपलब्ध करुन दिल्या उद्योग धंद्यासाठी कर्ज ही दिले. मागासवर्गीय संस्थे तर्फे चालविल्या जाणाऱ्या शाळा, महाविद्यालये व वस्तीगृहे यांना मुख्यमंत्री निधीतून साहय केले. विमुक्त व भटक्या जमातीनां गुन्हेगारी प्रवृत्ती पासून प्रावृत्त करुन त्याचे आर्थिक जीवन स्थीर होण्याच्या दृष्टीने त्याचे पुनर्वसन केले. १९६४ साली बंजारा समाजाच्या भटक्या जमाती मध्ये समावेश करुन घेऊन इतर मागासलेल्या जातीप्रमाणे त्यांना शैक्षणिक सवलती उपलब्ध करुन दिल्या. १९७४ साली मार्च महिण्यात मराठवाड्याच्या विकासाबद्दल ज्या विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. या आंदोलनामुळे वार्षिक परिक्षा बंद पडल्या, मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे ह्या आंदोलनात जास्त नुकसान झाले. व त्यांना परिक्षेत बसणे अशक्य झाले. तेव्हा नाईक साहेबांनी त्यांना पुन्हा परिक्षेत बसता यावे म्हणुन मुख्यमंत्री निधीतून प्रत्येक विद्यार्थ्याला मदत मंजूर केली.[१३]

५) अस्पृश्यता पाळणे ही संस्कृती नव्हे विकृती – वसंत विचार :–

माणसाने माणसात फरक करणे, माणसाने माणसाला माणसाप्रमाणे न वागविणे यात संस्कृतपणा आहे काय? घाणेरड्या जनावराला स्पर्श करतो. तेव्हा आम्ही बाटत नाही. कुत्र्या मांजराला स्पर्श करतो तेव्हा ही आम्हला विटाळ होत नाही. पण अस्पृश्य समाजात जन्मलेला माणुस किती ही स्वच्छ, चांगला असला तरी त्याला हात लागल्याने मात्र आम्ही बाटतो! आणि काय आश्चर्य? पाण्याचे चार शिंतोडे घेतले म्हणजे आम्ही लगेच शुध्द पण होते. भारतीय समाज किती विकृत मनोवृत्तीने ग्रासला आहे. आपल्या स्पृश्यास्पृश्यतेचा कल्पना किती खुळ्या आणि निरर्थक आहेत यांची यावरुन कल्पना येते. तिच जर आम्हाला उच्च संस्कृती वाटत असेल तर आपण आपली कीथ केली पाहिजे.[१४] नाईक

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

साहेबांच्या मते अस्पृश्यता पाळणे म्हणजे संस्कृतीचे जतन करणे नव्हे तर संस्कृतीची विकृती होय. जर अस्पृश्यता पाळल्याने संस्कृतीची विकृती होत असेल तर तशी अस्पृश्यता पाळण्यास नाईक साहेबाचा विरोध होता.

६) बंजारा समाजाला प्रेरणा :–

वसंतराव नाईक यांनी बंजारा समाजामध्ये नव जागृतीचे पुनरुत्यान करण्याचे कार्य त्यांनी याच वेळी स्वीकारले. डोंगराच्या पायथ्याशी तांडा करुन राहणाऱ्या या समाजाच्या पोषाखापासून त्यांनी जुनी पंरपरा सोडण्यात सुरुवात केली. समाजातील वाईट चालीरिती सोडुन टाकणयासाठी अथक प्रयत्न केले. दारु सोडण्यापासुन लोकांना परावृत्त करणे, चोरी मारामारी या सारख्या प्रवृत्तीचा बिमोड करणे व शिक्षणाचे महत्व लोकांना पटवून देणे. या सारखी कामे त्यांनी या भटक्या जमातीत चैतन्या आणण्यासाठी केले.[१५] यामुळे एकंदरी बंजारा समाजामध्ये प्रेरणा निर्माण झाली व बंजारा समाज हा वाईट चालीरिती मधून बाहेर पडून समाजात प्रेरणा निर्माण झाली व आणि हे समाज हितासाठी कारणीभूत ठरली.

७) आंतरजातीय विवाह :–

वसंतराव नाईक हे बंजारा समाजातील होते तर वत्सलाबाई हे नागपुर येथील प्रसिध्द घाटे (ब्राम्हण) घराण्यातील होत्या. वसंतराव नाईकांनी जातीपातीला थारा न देण्याच्या विचारसारणीतून ६ जुलै १९४१ मध्ये प्रतिष्ठीत ब्राम्हण घराण्यातील कु.वत्सला घाटे यांच्याशी विवाह केला. हा विवाह आंतरजातीय असल्याने त्यांच्या बंजारा समाजात मोठी खळबख उडाली होती त्यामुळै नाईक साहेबांनी काही काळ किंवा दिवस वाळीत देखील टाकण्यात आले.[१६] या संपुर्ण परिस्थितीवर मात करुन नाईक साहेबांनी आपल्या धर्मपत्नी वत्सलाबाई सोबत संसार केला व समाजाची पर्वा न करता त्यांनी त्या काळात आंतरजातीय विवाह केला. यामधून त्याचे जातीपाती मध्ये कोणत्याही प्रकारचे उच्च निच्च भेदभाव मानला नाही त्याचे हे कार्य म्हणजे समाजसुधारणा प्रेरणा देण्याचे कार्य होते.

८) स्त्रीयांना प्रतिष्ठा मिळवून दिली :–

वसंतराव नाईकांनी ज्यावेळी आंतरजातीय विवाह केला त्या वेळेस नाईक साहेबांनी काळाचा विचार न करता वत्सलाबाईशी विवाह केला ही क्रांतीकारक घटनाच होती. वसंतराव नाईक हे बंजारा जातीचे आणि वत्सलाबाई ब्राम्हण घराण्यातील असल्या तरी त्यांनी आपल्या जीवनसाथीला नेहमीच सन्मानाने वागवले.[१७] आपल्याकडे राजकीय व सामाजिक क्षेत्रात काम करणारे नेते नेहमीच स्त्री–स्वतंत्र आणि स्त्रीयांची प्रतिष्ठा यावर नेहमीच जोर देऊन व्याख्याने देतात. परतु क्वचितच राजकीय नेते आपल्या पत्नीला सार्वजनिक समारंभात आणतांना दिसतात बहुंताश राजकीय व सामाजिक नेते ते ज्या क्षेत्रात काम करतात त्या क्षेत्रात आपल्या पत्नीचा जणू काही संबंध नसावा अशीच त्याची धारणा झालेली दिसते परंतू अशा राजकीय नेत्यातून वसंतराव नाईकाची आचार – विचार निश्चितच निराळे होते. हे त्यानी वत्सलाबाईला ज्या पध्दतीने प्रकाशात आणले त्यावरुन सिध्द होते.[१८]

९) शैक्षणिक योगदान :–

वसंतराव नाईक यांनी सामाजिक कार्याबरोबरच शैक्षणिक कार्यात पण कार्य केल्याचे दिसते. ३ सप्टेंबर १९६० रोजी वसंतराव नाईकसाहेब यांचे तीर्थरुप (वडिल) फुलसिंग बापू यांचे वृध्दापकाळाने दुःखद निधन झाले. गहुली येथे त्याचा पार्थिवावर अत्यसंस्कार करण्यात आल्यानंतर झालेल्या शोकसभेत उच्च शिक्षणाबद्दलची फुलसिंग नाईकांची तळमळ व उत्कट ध्यास लक्षात घेवून त्या शोक सभेत जनता शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करण्याची घोषणा करण्यात आली.[१९] २० जुन १९६१ रोजी कला आणि वाणिज्य विद्याशाखा असलेले फुलसिंग नाईक महाविद्यालय पुसद येथे भाड्याच्या इमारतीत सुरु करण्यात आले पहिल्या शैक्षणिक सत्रात (१९६१–६२) १०२ विद्यार्थीनी प्रवेश घेतला नंतर लगेचच महाविद्यालयासाठी पुसद – यवतमाळ मार्गावर ५५ एकर जमीन विकत घेण्यात आली. या इमारतीच्या कोनशिल समारंभाला राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हान यांच्या हस्ते संपन्न झाले. १९५७ च्या दरम्यान जनता शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षापदी ॲड.बाबासाहेब पल्लेवार यांची निवड करण्यात आली. १९७४ साली मुख्यमंत्री असलेल्या वसंतराव नाईकसाहेबाच्या मार्गदर्शनाखाली डॉ.एन.पी.हिराणी व मनोहरराव नाईक यांनी विज्ञान शाखा सुरु करण्याचा निर्णय घेतला. या विज्ञान शाखेमुळे शेतकरी, शेतमजुर, आर्थिकदृष्टया दुर्बल, मागासवर्गीय आदिवासी कुटूंबातील अनेक मुले डॉक्टर आणि इंजिनिअर झालेली आहेत. आज या महाविद्यालयात पदवी वर्गाबिरोबर एम.ए.(मराठी व इंग्रजी) एम.कॉम व एम.एस्सी.(रसायनशास्त्र) या विषयाचे स्तानकोत्तर वर्ग सुरु असून सुमारे दोन हजारपेक्षा अधिक विद्यार्थी अध्ययन करीत आहेत.[२०]

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

निष्कर्ष :–

हरीत क्रांतीचे प्रणेते, महानायक, माजी मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांनी महाराष्ट्र राज्याच्या जडणघडणीसाठी फार मोठे योगदान दिले आहे. महाराष्ट्र राज्याचा सर्वांगीन विकास व्हावा. यासाठी त्यांनी त्यांच्या कार्यकाळात विविध विकासत्मक योजन अमंलात आणल्या. सोबतच त्यांनी सामाजिक कार्यात सुध्दा सहभाग घेतला. समाजातील उपेक्षित घटकांकडे त्यांनी विशेष लक्ष दिले. ते ज्या बंजारा समाजातून आले होते तो समाज शैक्षणिक, सामाजिक दृष्ट्या दुर्बल होता त्याला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यामुळेच आज या समाजातील अनेक प्रतिभावंत आणि प्रज्ञावंत तरुण विविध क्षेत्रात तेजाने तळपत आहेत. यांचे श्रेय हे वसंतराव नाईक साहेब यानांच दयावे लागते. आणि एकुणच या तरुण वर्गानी आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत बळ दिल्याचे दिसते.

संदर्भग्रंथ

१) लोकराज्य – डिसेंबर – २०१२, पृ.क्र.५.
२) रुद्रवार अ.गो.(स्मरणिका), व.ना.स्मृ.प्र.पु.२००२ पृ.क्र.१४.
३) कित्ता – पृ.क्र.२४.
४) कित्ता – पृ.क्र.२६.
५) राठोड राजाराम,(सं.पा.)–हिरवी क्षितीजे १९८७ – पृ.क्र.६.
६) दर्डा विजय, लोकमत, (सं.पा.) व.ना.ष.पू.वि.१९७३ – पृ.क्र.११.
७) महाराष्ट्र टाईम (सं.पा.) १९७३ पृ.क्र.७.
८) दर्डा विजय, लोकमत (सं.पा.) व.ना.ष.पू.वि. १९७३ – पृ.क्र.३.
९) राठोड राजाराम,(सं.पा.)हिरवी क्षितीजे १९८७ – पृ.क्र.१५.
१०) चव्हाण संजय, स्मरणिका (सं.पा.)व.ना.स्मृ.प्र.पु.२००२ – पृ.क्र.१५.
११) राठोड राजाराम,(सं.पा.)हिरवी क्षितीजे १९८७ – पृ.क्र.७.
१२) लोकमत विशेषांक – १९७३.
१३) मधुकर भावे, यशवंतराव ते विलासराव २००८ – पृ.क्र.७८.
१४) लोकराज्य,–डिसेंबर – २०१२ – पृ.क्र.४६.
१५) दर्डा विजय, लोकमत (सं.पा.) व.ना.ष.पू.वि.१९७३ – पृ.क्र.३.
१६) लोकराज्य – डिसेंबर–२०१२ – पृ.क्र.३८.
१७) राठोड राजाराम,(सं.पा.) वर्षा निबंध संग्रह १९८० – पृ.क्र.७३.
१८) राठोड राजाराम,(सं.पा.) हिरवी क्षितीजे १९८७ – पृ.क्र.१६.
१९) मधुकर भावे, महानायक – २०११ पृ.क्र.३१४.
२०) कित्ता – पृ.क्र.३१५.